नि.फौ.ख.क्र.२८७/२०२२
सरकार –वि–तुळशीराम चौधरी
निशाणी क्र. २२

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ सोमनाथ नामदेव चौधरी यांचा शपथेवर आरोपीचे वकील श्री. व्ही.एस.पाटील यांच्यामार्फत उलटतपास चालू.</u>**

०३. आरोपी नात्याने माझे चुलते लागतात. हे म्हणणे खरे नाही की सदर घटनेपूर्वी पासून माझे व आरोपींचे संबंध चांगले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की आमच्या वडीलोपार्जित मिळकतींचे तोंडी वाटप झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की तोंडी वाटप झाल्यामुळे आमच्यामध्ये खाते वाटप झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्यामध्ये व आरोपीमध्ये शेतीच्या कारणावरुन नेहमी वाद होत असतात. हे म्हणणे खरे आहे की शेतीच्या वादावरुनच आरोपींनी माझ्या वडिलांविरुद्ध सहा ते सात वर्षांपूर्वी पोलीस स्टेशनला तक्रार देखील दिली होती. हे म्हणणे खरे आहे की त्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी आमच्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही अथवा न्यायालयामध्ये केस देखील पाठविली नाही.

०४. सरकारी साक्षीदार माणिक नारायण चौधरी व निवृत्ती नारायण चौधरी हे दोघेही माझ्या परिचयाचे आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की ते त्याचे चुलत भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की माणिक चौधरी, निवृत्ती चौधरी यांचे आरोपींसोबत चांगले संबंध नाहीत.

०५. आरोपींसोबत माझा जो तथाकथित वाद झाला होता तो गट नं. ६ मध्ये झाला होता. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ६ आमच्यामध्ये आरोपींमध्ये सामाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नं. ६ मध्ये घातलेल्या बांधावरुन माझे व आरोपींचे नेहमी वाद होत असतात.

०६. मी व आरोपी गट नं. ६ मध्येच राहायला आहे. गट नं. ६ च्या आजूबाजूला अशोक चौधरी व शिवनाथ चौधरी राहतात. आमचे गाव खिल्लारी पाडा पारेगाव ते वडनेर भैरव हे अंतर साधारणतः २० कि.मी. आहे. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल अ कडील फावडे मी पोलीसांना दिले. हे म्हणणे खरे आहे की असे फावडे प्रत्येक शेतकऱ्याकडे असते. हे म्हणणे खरे आहे की फावडा व दांडा या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

०७. पोलीसांनी माझा जबाब नाशिक सिव्हील हॉस्पीटल मध्ये घेतला. पोलीस जेव्हा माझा जबाब घेत होते तेव्हा मी एकटाच होतो व तपासी अंमलदार आवारे होते. पोलीसांनी माझा जबाब २३ तारखेला दुपारी १२:०० ते १:०० च्या दरम्यान घेतला. नाशिकच्या सिव्हील हॉस्पीटलमधून मला किती तारखेला सोडले हे सांगता येणार नाही. सिव्हील हॉस्पीटलमधून मला कधी सोडले याच्या पावत्या मी पोलीसांना दिल्या नाहीत. तसेच पोलीसांनी देखील त्यांची माझ्याकडे मागणी केली नाही.

०८. मला जेव्हा लागले होते तेव्हा पोलीसांनी मला उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वडनेर भैरव येथे यादीसह पाठविले होते. मी उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वडनेर भैरव येथे संध्याकाळी ५:०० ते ६:०० च्या दरम्यान गेलो होतो. नाशिकला पुढील उपचारासाठी जाण्यासाठी मला प्राथमिक आरोग्य केंद्र वडनेर भैरव यांनी लेखी कागद दिला होता. तो कागद मी पोलीसांना दिला नाही. (सदर प्रश्न विचारण्यास सरकारी वकिलांनी आक्षेप नोंदविला की तो कागद सिव्हील हॉस्पीटलला जमा होत असल्याने हा प्रश्न साक्षीदाराला विचारता येणार नाही मात्र माझ्यामते हा प्रश्न युक्तिवादावेळी पाहता येईल त्यामुळे प्रश्न विचारण्यास काहीही हरकत नाही. त्यामुळे सरकारी वकिलांचा आक्षेप फेटाळण्यात आला.)

०९. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी मला सही करायला सांगितल्यावर मी सही केली. गट नं. ६ मधून इतर ठिकाणी आमचा जाण्या–येण्याचा जो रस्ता आहे तो चांगला नाही. मी आज न्यायालयात साक्ष देण्यासाठी मोटारसायकलने आलो. हे म्हणणे खरे नाही की मी माझी आई व पत्नी मोटारसायकलवरुन जात असतांना पडून आम्हाला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की आरोपींसोबत शेतीच्या कारणावरुन आमचा जुना वाद असून त्या लागलेल्या माराचा गैरफायदा घेवून मी आरोपींविरुद्ध खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी मी शेतात वखरत असतांना आरोपींनी तेथे येऊन माझ्याशी वाद केला व फावड्याने मला व माझ्या कुटूंबियांना मारुन जखमी केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी आरोपींनी मला व माझ्या कुटूंबियांना शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल अ कडील फावडे पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केले. ते फावडे जप्त करतांना माझे वडील, माझी

पत्नी व मुले होती. फावडे जप्त करत असतांना पोलीसांनी माझ्या कुटूंबियांच्या सह्या घेतल्या किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल अ कडील फावडे मी केवळ न्यायालयात साक्ष देतानाच पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपींसोबत माझा शेतीवरुन जुना वाद असल्यामुळे त्याचा गैरफायदा घेऊन मी आरोपींविरुद्ध खोटी फिर्याद दिलेली आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.06.24 11:34:52 +0530

**दि. २३.०६.२०२५**

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,
चांदवड.